**नियमित दिवाणी दावा क्र.५९/२००९**
**शकुंतला वि. व्यंकट**

−:: **नि.क्र. १४६ आदेश** ::−

प्रस्तुत अर्ज हा कागदपत्र दाखल करण्यासाठी आहे. प्रतिवादींनी त्यास प्रखर विरोध केलेला आहे. मी प्रकरणाचे काळजीपूर्वक आवलोकन केले आणि दोन्ही पक्षांच्या अधिवक्त्यांना ऐकले. दावा फार जुना आहे. तो पुराव्याकरिता प्रलंबित असताना वादीने यादी निशाणी १४३ सोबत कार्यक्रम पत्रिकेची छायांकीत प्रत सादर केली होती. त्या वेळी वादीने मूळ प्रत सादर न करण्याचे कारण दिले नव्हते. वादी ही या अर्जासोबत कार्यक्रम पत्रिकेची मूळ प्रत सादर करू इच्छीते परंतू त्याबाबत पुरसे कारण दिलेले नाही. यथास्थितीत विलंबाने कागदपत्र दाखल करण्याचे कारण उपलब्ध नाही. त्यामुळे सदर कागदपत्र अभिलेखावर घ्यायचे असल्यास खर्च लावणे उचित ठरेल. दाव्यातील वाद स्थिती बघता सदर कागदपत्र दाखल करण्याची परवानगी खर्च रुपये ३००/− भरण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येते. वादीने आदेशाची पूर्तता पुढील तारखेपर्यंत करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.04.16 17:32:48 +0530

**ठिकाण — देवणी**
**दिनांक − १६−०४−२०२६**

**( श.अ. सुरजुसे )**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**